पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-44
क्र.-फक्षेका/सभा/कावि/50 /2019
दिनांक :– 30/11/2019

प्रति,
मा.-----------------------------------
सदस्य/सदस्या
फ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी – 411044.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि. 5/12/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक 05/12/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील **"राजर्षी शाहू महाराज सभागृहात"** आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. तरी आपण सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू ,

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरलिका

सुचना - सदर सभेस आपली उपस्थिती आवश्यक आहे. काही कारणास्तव शक्य नसल्यास प्रतिनीधीस पाठवावे.

प्रत – 1. संबंधित शाखाप्रमुख / विभागप्रमुख------------------------ विभाग
2. कार्यालयीन नोटिस बोर्ड

कृ. मागे पहा

Scanned with CamScanner

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411018**
**मा. फ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक – 08**

दिनांक:- 05/12/2019 वेळ. सकाळी 11.30 वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि. 05/12/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजर्षी शाहू महाराज सभागृहात** " आयोजित करणेत आली आहे. सदर सभेस खालील प्रमाणे कामकाज होईल.

अ) दि. 07/11/2019 रोजी स.11.15 वा. झालेल्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक 06) कायम करणे.

ब) दि. 07/11/2019 रोजी स.11.30 वा. झालेल्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक 07) कायम करणे.

विषय क्रमांक - 1. फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. 11 मधील विविध प्रकल्पांचे नामकरणाबाबत मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. 19 दि. 04/12/2018 अन्वये सन्मा. प्रभाग समिती सदस्यांमार्फत ठेवलेला विषय सर्वानुमते मान्य करणेत आलेला असुन सदर ठरावान्वये घरकुल प्रकल्प कमान (प्रवेशद्वार)– १) लोकनेते गोपीनाथ मुंडे नगर २) समस्त नेवाळे मळा प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

फेडरेशन ऑफ घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिखली, भारिप बहुजन महासंघ व संविधान दिन सोहळा समिती यांनी दि. 01/01/2019 चे पत्रानुसार घरकुल प्रकल्प कमानचे नामकरणास विरोध दर्शविला आहे.

दिनांक 23/01/2019 रोजी आपले सरकार वेबपोर्टलवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केलेला ठराव दुरुस्त करुन घरकुलचे नामकरण हे प्रचलित नावाप्रमाणेच घरकुल नवनगर संकुल करण्यात यावे अशी तक्रार दाखल केली आहे.

तसेच भगवानबाबा प्रतिष्ठाण – मोरवाडी, जयभगवान महासंघ - पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी पिंपळे गुरव या यांनी दि. 16/01/2019 व 21/01/2019 चे पत्रान्वये घरकुल प्रकल्पाचे "स्व. गोपीनाथ मुंढे नगर" नामकरण करणेबाबत समर्थन केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे काही संस्थांनी विरोध दर्शविला असून काही सस्थांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचा घरकुल नामकरणाबाबतचा विषय नजीकच्या मा. प्रभाग समिती सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करणेत यावा.

संदर्भ-१.मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/प्रशा/१/कावि/१२५/२०१९ दि.१/२/२०१९.
२.मा.फ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ६ दिनांक ४/७/२०१९
(दिनांक 5/12/2019 चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक - 2. मा.सभापती यांचे परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरलिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी
क्रमांक:-फक्षेका/सभा/कावि/ 50 /2019
दिनांक :– 30/11/2019

Scanned with CamScanner